# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग
## आय.एस.ओ. ९००१:२००८ युनिट

# परिपत्रक

विविध अनुदान संस्थांकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास अनुदान प्राप्त होत असते. अनुदान प्राप्त झाल्यानंतर असे निदर्शनास येत आहे की, काही अनुदान संस्था मंजूर अनुदान रकमेतून आयकर कपात करुन उर्वरित रक्कम विद्यापीठास वर्ग करतात.

आयकर कायदा १९६१, कलम १०(२३C) (iii ab) अन्वये विद्यापीठास प्राप्त होणा-या उत्पन्नास आयकरातून सूट देण्यात आलेली आहे. तसेच अनुदानाची रक्कम उत्पन्न या स्वरुपाची नसल्यामुळे मंजूर झालेले अनुदान आयकर कपात न होता विद्यापीठास प्राप्त होणे आवश्यक आहे. अनुदान संस्थेने आयकर कपात सूट प्रमाणपत्र (Income Tax Exemption Certificate) ची मागणी केल्यास प्रकल्प प्रमुखांनी 'आयकर सूट' या संदर्भातील पत्र वित्त व लेखा विभागातील बुक युनिट या विभागातून प्राप्त करुन घ्यावे व संबंधित संस्थेस सादर करावे. तसेच ज्या प्रकल्पाचे अनुदान मंजूर होणार आहे त्याचे मंजूरी पत्र त्वरित संस्थेकडून मागविण्यात यावे व त्यास अनुसरुन आपल्यास वरीलप्रमाणे आयकर कपात न होता पूर्ण अनुदान प्राप्त झाले आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यात यावी. अन्यथा आयकर कपातीची रक्कम आयकर खात्याकडे वर्ग केल्यास रक्कम प्राप्त होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. आयकर कपात असल्यास त्याचा पाठपुरावा करुन आयकर कपातीच्या रक्कमेचा परतावा रक्कम प्राप्त झालेल्या महिन्यामध्येच अनुदान संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावा.

गणेशखिंड,पुणे -४११ ००७.
जावक क्र. वित्त/अनुदान/२०१५-१६/११४०
दि. ११/०८/२०१५

१३/८

**वित्त व लेखा अधिकारी**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:
१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग प्रमुख.
२. प्रमुख,विकेंद्रित वित्त शाखा.